# बांगलादेशींसह स्थानिकास एटीएसकडून अटक

**नाशिक** : बांगलादेशातील अस्थिरतेमुळे भारतातील घुसखोरी चर्चेत असतानाच नाशिकच्या दहशतवादी विरोधी पथकाने शहरातील पाथर्डी गाव परिसरात वास्तव्यास असलेल्या दोन महिलांसह एका तरुणास बेड्या ठोकल्याने खळबळ उडाली आहे. संबंधितांना सदनिका मिळवून देणाऱ्या स्थानिक मध्यस्थालाही पोलिसांनी अटक केली असून, कोर्टाने दोघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी, तर महिलांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने त्यांची नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शागोर मोहमंद अब्दुल हुसेन माणिक (२८, मूळ रा. पाबना, इशोरदी बांगलादेश, ह. मु. काझी मंजिल, जाधव पेट्रोलपंपाजवळ) व गोरक्षनाथ विष्णू जाधव (३२, रा. वरवंडी, ता. दिंडोरी) अशी पोलीस कोठडी सुनावण्यात आलेल्या संशयितांची नावे असून, मुस्मम्मत शापला खातून (२६) व इतीखानम मोहम्मद लाएक शेख (२७, मूळ रा. मल्लिकपूर नोडाई, बांगलादेश, ह. मु. काझी मंजिल, जाधव पेट्रोलपंपाजवळ) अशी कारागृहात रवानगी करण्यात आलेल्या संशयित महिलांची नावे आहेत. उपजीविकेसाठी दोन्ही महिलांसह २८ वर्षीय तरुण दोन महिन्यांपूर्वी शहरात आले. संशयित महिला ब्युटी पार्लरमध्ये काम करीत होत्या, तर हा तरुण छताचे पीओपी बनविणारा कारागीर आहे. तीन बांगलादेशी नागरिक पाथर्डी गाव परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार रविवारी (१८ ऑगस्ट) दोन महिलांसह २२ वर्षीय युवकाला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत संशयित दोन महिन्यांपूर्वी उपजीविकेसाठी शहरात दाखल झाल्याचे निष्पन्न झाले. दिंडोरी येथील जाधव नामक व्यक्तीने त्यांना मदत केली. पाथर्डी गाव परिसरात सदनिका उपलब्ध करीत करारनामा करून दिला. संशयित महिला याच भागातील ब्युटी पार्लरमध्ये काम करीत होत्या. बांगलादेशी नागरिकांना सदनिका उपलब्ध करणाऱ्या जाधव नामक व्यक्तीलाही अटक करण्यात आली. एटीएस पथकाने या संशयितांना इंदिरानगर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. संशयित महिला ज्या ब्युटी पार्लरमध्ये काम करीत होत्या त्या संचालकाची चौकशी केली जाणार आहे. प्रथमदर्शनी बांगलादेशी संशयित केवळ वास्तव्यासाठी शहरात दाखल झाल्याचे समोर येत असून, त्यांच्याकडे संशयास्पद वस्तू किंवा आक्षेपार्ह पुरावे आढळलेले नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याबाबत इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास वरिष्ठ निरीक्षक अशोक शर्माळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चौधरी करीत आहेत.

# मालमत्ता हडपण्यासाठी मनोरुग्णाचा खून

**नाशिक** : मालमत्ता हडप करण्यासाठी नातेवाईकांनी एका मनोरुग्णाचा खून केल्याचा प्रकार समोर आला आहे. मृताच्या चुलत भावाने दिलेल्या फिर्यादीवरून मुंबई नाका पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांनी पलंगावरून पडल्याने मनोरुग्णाचा मृत्यू झाल्याचा बनाव केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंजीतकौर चड्ढा, तेजकिरण चड्ढा (रा. शिंगाडा तलाव), शरणसिंग गिल (रा. द्वारका) व करणसिंग गिल (रा. कमोदनगर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. याबाबत अभिजीत सिंग जतिंदरसिंग गुजराल (रा. सद्गुरूनगर, तिडके कॉलनी) यांनी फिर्याद दिली आहे. तक्रारदार गुजराल यांचे काका जसपालसिंग चढ्ढा यांनी हयात असताना १० जुलै २०२० रोजी आपल्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचे मृत्यूपत्राद्वारे वाटप केले होते. या वाटपपत्रात पत्नी वगळता मुलगा तेजकिरणसिंग चढ्ढा यांना ५० टक्के, मुलगी अस्मितकौर हीस २० टक्के, तक्रारदार पुतण्या २० टक्के, तर मृत पुतण्या गुरुपालसिंग सेठी ऊर्फ गुरुपाल राजा यास १० टक्के वाटा देण्यात आलेला. जसपालसिंग चढ्ढा यांनी आपल्या मृत्यूपत्रात पुतण्या गुरुपाल हा मनोरुग्ण असल्याने त्याच्या पालन-पोषणाची जबाबदारी मुलगा तेजकिरणसिंग चढ्ढा व अस्मितकौर चड्ढा यांच्यावर सोपविण्यात आली होती. मात्र, संशयितांनी अन्य नातेवाईकांच्या मदतीने कटकारस्थान करून चुलत भाऊ गुरुपाल सिंग सेठी ऊर्फ गुरुपाल राजा याचा खून केल्याचा आरोप तक्रारदार अभिजीतसिंग गुजराल यांनी केला आहे. मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने संशयितांनी कट करून मनोरुग्ण असलेल्या भावास जीवे मारले. गेल्या जुलैमध्ये सायंकाळी सहापूर्वी संबंधितांनी भावास घरात डांबून, उपाशीपोटी ठेवून मारहाण करीत कपाळ, डोक्यावर, छातीवर, मांड्यांवर टोच्यासारख्या तीक्ष्ण हत्याराने गुरुपाल याने स्वतःच्या अंगावर ओरखडून घेतल्याचा बनाव केला. मृत्यूनंतर गुरुपाल हा मनोरुग्ण असल्याचा आधार घेऊन तो पलंगावरून पडल्याचे रुग्णालयात सांगण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास सहायक निरीक्षक वाघ करीत आहेत.

# महिला डॉक्टर – सुरक्षा रक्षक, अधिष्ठातांचे रक्षाबंधन

**मुंबई** : कोलकाता येथील घटनेनंतर जे.जे. रुग्णालयातील महिला डॉक्टरांनी सुरक्षा रक्षकांसह, पुरुष डॉक्टर व अधिष्ठात्यांना राख्या बांधल्या. याद्वारे बहिणीचे रक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांसह जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांनी आपल्या वरिष्ठांना राखी बांधली आणि त्यासोबत आंदोलन करत सरकारचा निषेध व्यक्त केला.

(छाया : वीरेंद्र चित्रकार)

जे.जे., केईएम, नायर, सायन आदी रुग्णालयांतील महिला निवासी डॉक्टरांनी सुरक्षा रक्षक, पुरुष डॉक्टर, अधिष्ठाता, वॉर्ड बॉय आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना राखी बांधून संरक्षण करण्याचे आवाहन केले. राखी बांधण्याची ही कृती केवळ प्रतीकात्मक नसून आमच्या डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांवर जमावाच्या हिंसक हल्ल्यांपासून आमचे संरक्षण करण्याचे थेट आव्हान असल्याचे मार्डने म्हटले आहे. दरम्यान, चारही प्रमुख रुग्णालयांतील डॉक्टर्स सकाळी सायन रुग्णालयात जमा झाले होते. हजारोंच्या संख्येने जमलेल्या या डॉक्टरांनी आंदोलन करत जमलेल्या रुग्णांचे लक्ष वेधले. नुकताच सायन रुग्णालयातही एका महिला डॉक्टरवर हल्ला करण्यात आला. त्याच्याही निषेधार्थ डॉक्टरांनी घोषणाबाजी केली.

# कातकरी समाजाच्या कुटुंबांना हक्काची घरे मिळणार – पालकमंत्री

**मुंबई** : कातकरी समाजाचा ७० भटक्या कुटुंबांच्या घरांसाठी जागेची समस्या होती. वर्षानुवर्षे त्यांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित होता. सरकारकडे या समाजातील कुटुंबांना देण्यासाठी जमीन उपलब्ध नव्हती. जेव्हा ही समस्या सिंधुदुर्गनगरी येथील जनता दरबारात मांडण्यात आली, त्यावेळी ही समस्या ताबडतोब सोडविण्यात आली. यासाठी आपण स्वतःची ओसरगाव येथील जागा देण्याचा निर्णय घेतला आणि जागासुद्धा निश्चित करण्यात आली आहे. यामुळे या कातकरी बांधवांना लवकरच हक्काची घरे उपलब्ध होतील, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. जनता दरबारात ८२ अर्ज दाखल झाले होते. पैकी ७४ अर्जांचे निरसन झाल्याचे त्यांनी सांगितले.

स्वतःची जमीन देण्याच्या ऐतिहासिक निर्णयामुळे या सर्व कुटुंबांनी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचे मनापासून आभार मानले आणि असा नेता किंवा मंत्री आम्ही कधीच पाहिला नाही. वर्षानुवर्षे आम्ही भटकत होतो, पण आता आम्हाला हक्काचा निवारा मिळाला आणि आता आमच्या सर्व पिढ्या हक्काच्या घरात राहतील, त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे, अशी भावना सर्वांनी व्यक्त केली. सिंधुदुर्गनगरी येथे जिल्हा नियोजन सभागृहात पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत जनता दरबार झाला. या कार्यक्रमात मंत्री रवींद्र चव्हाण बोलत होते. याप्रसंगी रवींद्र चव्हाण यांच्यासोबत भाजप आमदार नितेश राणे, जिल्हाधिकारी किशोर तावडे, जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मकरंद देशमुख, पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावळे, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, माजी आ. अजित गोगट आदींसह खातेप्रमुख तसेच कणकवली विधानसभा मतदारसंघातील सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.

# मिहीर शहाची उच्च न्यायालयात धाव

**पोलिसांच्या कारवाईवर आक्षेप**

**वरळी हिट अँड रन प्रकरण**

मुंबई : वरळी येथे बेदरकारपणे कार चालवून निष्पाप महिलेचा बळी घेणाऱ्या मिहीर शहाने उच्च न्यायालयात धाव घेत पोलिसांच्या कारवाईला आक्षेप घेणारी याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर २१ ऑगस्टला सुनावणी होण्याची शक्यता आहे.

मिहीरने ७ जुलैला दारूच्या नशेत बेदरकारपणे बीएमडब्ल्यू कार चालवली आणि वरळी परिसरात नाखवा दाम्पत्याला जोरदार धडक दिली. त्यात कावेरी नाखवा या महिलेचा मृत्यू झाला. मिहीरने गाडीखाली चिरडलेल्या कावेरी यांना निर्दयीपणे वांद्रे-वरळी सागरी सेतूपर्यंत फरफटत नेले होते. घटनेनंतर फरार झालेल्या मिहीरला ९ जुलैला विरारच्या रिसॉर्टमधून पोलिसांनी अटक केली. सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या मिहिरच्या वतीने ॲड. नेहा पाटील यांनी जामीन अर्ज करण्यापूर्वी पोलिसांच्या कारवाईवर आक्षेप घेत याचिका दाखल केली आहे.

# महायुतीतील नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप सुरूच

(पान १ वरून) यांच्यावर 'विश्वासघातकी' असा तिखट हल्ला चढवून या आरोप-प्रत्यारोपामध्ये तेल ओतले. त्यामुळे, महायुतीत सध्या नेमके काय चालले आहे? निवडणुकीला जनतेसमोर ते एकत्रित कसे सामोरे जाणार, असे प्रश्न राजकीय वर्तुळात विचारले जाऊ लागले आहेत.

लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्यानंतरही महायुतीतील तिन्ही पक्षांतील नेत्यांतील मतभेद गेल्या काही दिवसांपासून सातत्याने समोर येत आहेत. तिन्ही पक्षांत कोणताही समन्वय नसल्याचे आणि वेगवेगळ्या घटनांवरून कुरघोड्या सुरूच असल्याचे चित्र त्यातून मतदारांसमोर जात आहे. कदम यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या कामावरून आणि मार्गावर पडलेल्या खड्ड्यांवरून चव्हाण यांच्यावर जहरी टीका केली. त्यामागे चव्हाण यांनी कदम यांचे चिरंजीव योगेश कदम यांच्या मतदारसंघात घातलेले लक्ष कारणीभूत असल्याचे भाजपमधून सांगितले जाते. यासंदर्भात कदम यांनी भाजपच्या दिल्लीतील पक्षनेतृत्वालाही पत्र लिहून तक्रार केल्याचे समजते. 'चव्हाण यांना शिवसेनेची ॲलर्जी आहे. भाजपला राक्षसी महत्त्वाकांक्षा असेल, तर त्यांनी युती तोडावी. आमचे आम्ही लढू, तुमचे तुम्ही लढा,' असा हल्ला कदम यांनी भाजपवर चढवला आहे. यावर अधिक बोलणे शक्य नसल्याने कदम यांनी महामार्गाचा मुद्दा उकरून चव्हाण यांना लक्ष्य केल्याचे सांगितले जाते.

कदम यांच्या या जहरी टीकेनंतर चव्हाण यांनीही त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. 'मुंबई-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. त्याची जबाबदारी नितीन गडकरी यांच्याकडे आहे. हे कदम यांना माहीत नाही काय? कदम अडाणी माणूस आहे. त्यांना काहीही माहिती नाही. हा माणूस १५ वर्षे मंत्री होता. ३० वर्षांपासून शिवसेनेचा नेता आहे. कदम यांनी कोकणासाठी काय केले ते सांगावे. मी युतीधर्म पाळतो, याचा अर्थ असा नाही की कोणी काहीही बोलावे. मलाही तशी भाषा बोलता येते. तोंड सांभाळून बोला, अन्यथा ते फोडल्याशिवाय राहणार नाही,' असे चव्हाण वाहिन्यांच्या कॅमेऱ्यासमोर म्हणाले. भाजप आणि शिवसेनेतील नेत्यांत वाद पेटला असताना भाजप आणि राष्ट्रवादीतही भडका उडाला आहे. रविवारी पवार यांची जन सन्मान यात्रा आंबेगाव येथे गेली, तेव्हा तेथील भाजपच्या स्थानिक नेत्या आशा बुचके यांनी काळे झेंडे दाखवून या यात्रेचा निषेध केला. त्यावरून मिटकरी यांनी 'आमच्या नेत्याचा भाजप व त्यांच्या लोकांनी मान राखला पाहिजे. फडणवीस यांनी यावर खुलासा करावा,' अशी मागणी केली. त्यावर मुळीक यांनी 'मिटकरींनी स्थानिक पातळीवर घडलेल्या घटनेवरून फडणवीस यांना प्रश्न विचारणे योग्य नाही. मिटकरींनी आपली उंची पाहून भाष्य करावे,' अशी टीका केली. दुसरीकडे, शिवसेनेचे थोरवे यांनी राष्ट्रवादी पक्ष हा विश्वासघातकी असून त्याचे नेतृत्व करणारेही विश्वासघातकी आहेत, असा आरोप करून तटकरे यांना लक्ष्य केले. 'थोरवे माझ्यासाठी अदखलपात्र आहेत, आमचे स्थानिक नेते त्यांना उत्तर देतील,' असे सांगून तटकरे यांनी थोरवे यांना उडवून लावले.

# ...तर राजकारणातून संन्यास घेईन – देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून) माझ्यावर केलेले आरोप त्यांनी सिद्ध करून दाखवावेत. मराठा आरक्षणासंदर्भात मी कुठे अडवणूक केली, असे कोणाचे म्हणणे असेल, तर त्याबाबत मुख्यमंत्र्यांनाच विचारले पाहिजे. त्यांनी दुजोरा दिला, तर मी लगेच राजीनामा देईन. राजकारणातून संन्यास घेईन.

### नवाब मलिक यांच्याबाबतचे आक्षेप कायम – फडणवीस

राष्ट्रवादीचे नेते, माजी मंत्री नवाब मलिक यांनी महायुतीसोबत असणाऱ्या अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. अजित पवार यांची जनसन्मान यात्रा सोमवारी मलिक यांच्या अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघात आयोजित करण्यात आली होती. पवार यांच्या स्वागताच्या फलकांवर मलिक यांचे फोटो होते. मलिक यांना महायुतीत सामील करून घेण्यास फडणवीस यांनी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये जाहीर विरोध केला होता. फडणवीस यांनी मलिक यांच्यावरील विविध आरोपांचा उल्लेख करून पवार यांना पत्रही लिहिले होते. त्याबाबत विचारले असता फडणवीस यांनी, 'मलिक यांच्यासंदर्भातील माझी भूमिका अजिबात बदललेली नाही. आमचा मलिक यांना विरोध कायम आहे,' असे स्पष्ट केले.

## मराठा आरक्षणाला फडणवीसांचाच अडथळा : पटोले

**मुंबई** : मराठा आरक्षणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाच मुख्य अडथळा आहे, या मनोज जरांगे-पाटील यांच्या विधानात तथ्य आहे. काँग्रेस आघाडीचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राणे आयोग नियुक्त करून मराठा समाजाला आरक्षण दिले होते. पण, त्याविरोधात फडणवीसांच्या जवळचे लोकच न्यायालयात गेले होते, याची आठवण करून देऊन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी फडणवीस यांच्याविरोधात आणखी आरोप केले. मराठा आरक्षणप्रश्नी उच्च न्यायालयात बाजू मांडू नका, असा आदेश फडणवीस यांनीच दिला होता, असे तत्कालीन महाधिवक्ते आशुतोष कुंभकोणी यांनी उघड केले होते. फडणवीसांचेच निकटवर्तीय गुणरत्न सदावर्ते हे मराठा आरक्षणाविरोधात उच्च न्यायालयात गेले होते. त्यामुळे, फडणवीस आज जो खुलासा करत आहेत, तो साफ खोटा आहे, हे जरांगे-पाटील यांचे म्हणणे शंभर टक्के खरे आहे, अशी प्रतिक्रिया पटोले यांनी दिली. पटोले म्हणाले, आरक्षणाचा प्रश्न चिघळवत ठेवून सत्ता भोगण्याचे भारतीय जनता पक्षाचे धोरण ब्रिटिशांच्या 'फोडा व राज्य करा' या नीतीचेच रूप आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गायकवाड आयोग नेमला होता. मात्र, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. ते मुख्यमंत्री असतानाच विधिमंडळात आरक्षणाचा ठरावही संमत करण्यात आला होता. पण, नंतर तो न्यायालयात टिकू शकला नाही. आता सरकार जो निर्णय घेईल, त्याला विरोधी पक्षांचा पाठिंबा असेल, हे विरोधी पक्षांनी स्पष्ट केले असूनही हे सरकार विरोधकांवर आरोप करत आहे, हे चुकीचे आहे.

# आरोपीची होणार पॉलीग्राफ चाचणी

(पान १ वरून) आसपास पोलीस असल्याने आम्ही रुग्णांवर इलाज करू शकतो, अशी खोचक प्रतिक्रिया यावेळी एका डॉक्टरने दिली. ही ओपीडी म्हणजे प्रतीकात्मक विरोध आहे. आम्ही विरोधदेखील करत आहोत आणि ओपीडी सेवादेखील देत आहोत. कोलकात्याच्या घटनेतील सर्व आरोपी लवकरात लवकर पकडावेत आणि त्यांना अधिकाधिक शिक्षा व्हावी. तसेच भविष्यात अशी कोणतीही घटना होऊ नये, यासाठी सरकारने पावले उचलावीत, अशी आमची मागणी असल्याचे आंदोलक डॉक्टर म्हणाले.

दुसरीकडे सीबीआयकडून आर.जी. कर रुग्णालयाचे माजी डीन संदीप घोष यांची सोमवारी सलग चौथ्या दिवशी चौकशी सुरू होती. महिला डॉक्टरची हत्या झाल्याचे दिसत असताना आत्महत्या केल्याचे का सांगितले? घटनास्थळाचे रिनोव्हेशन का केले? पोलिसांना उशिरा का कळवले? घटनेनंतर तत्काळ पदाचा राजीनामा का दिला? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती घोष यांच्यावर करण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार, ते सीबीआयच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊ शकले नाहीत. दरम्यान, बलात्कार व हत्या झालेल्या महिला डॉक्टरची ओळख उघड केल्याप्रकरणी कोलकाता पोलिसांनी सोमवारी एका विद्यार्थ्याला अटक केली. या विद्यार्थ्याने सोशल मीडियावर तिचा फोटो शेअर केला होता. या पोस्टमध्ये त्याने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनादेखील जीवे मारण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी देखील त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'लॅटरल एण्ट्री' वरून घमासान

(पान १ वरून) पदांवर बसून काय कारनामे करतात, याचे ज्वलंत उदाहरण 'सेबी'चे आहे. तिथे खासगी क्षेत्रातून आलेल्या व्यक्तीला पहिल्यांदाच अध्यक्ष बनवले. पण, प्रशासकीय संरचना व सामाजिक न्याय दोघांचेही नुकसान करण्याला 'इंडिया' आघाडी ताकदीने विरोध करेल, असे राहुल यांनी ठणकावले. 'आयएएस'चे खासगीकरण करून आरक्षण मोडित काढणे हीच 'मोदी गॅरंटी' असल्याचा आरोप त्यांनी केला. तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, 'लॅटरल एण्ट्री'च्या माध्यमातून आरक्षण काढून घेत संविधान बदलण्याचा भाजपचा चक्रव्यूह आहे. शासकीय बॅकलॉग भरून काढण्याऐवजी मागील १० वर्षांत सार्वजनिक उपक्रम विकून ५.१ लाख पदे संपुष्टात आणल्याची टीका खरगेंनी केली.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website http://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| | |
|---|---|
| **Tender No.** EE/EHV(O&M)/ DN/ DMB/e-Tender-23/2024-2025<br>**RFx No.-**7000031807<br>**Name of Tender:** Notice for 3rd Call for SRM Tender for supply of Ladders at various Substations under EHV (O&M) Dn., Dombivali for FY 2024-2025.<br>**Estimated Cost:** Rs. 4,53,677/- [Inclusive of all Taxes]<br>**Tender Fee :-** Rs.500/- +5% Applicable Taxes<br>(For all above tender) | **Online Downloading the RFx:** 20.08.2024, 10:00 Hrs to26.08.2024, 23.59 Hrs<br>**Online Submission of the RFx:** On or Before 26.08.2024,23.59 Hrs<br>**Online Opening of the Techno Commercial response opening date:** 27.08.2024 at 10:00 hrs (If possible).<br>**Price Bid Opening Date:** 28.08.2024 at 10:00 hrs (If possible). |

For further details visit our website :-
**http://srmetender. mahatransco.in**
Contact Person :- The Dy. Executive Engineer,
(O) Mob No. :- 9833266055
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer, EHV O&M Dn Dombivali**



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**
**जाहीर सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार पूर्व उपनगरातील परिमंडळ-५ मधील 'एल' विभागातील ०२ प्रस्ताव, परिमंडळ- ६ मधील 'एस' विभागातील ०१ प्रस्ताव व टी विभागातील ०१ प्रस्ताव अशा **एकूण ०४** प्रस्तावास कलम ८ (६) अन्वये मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे/पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या - https://portal.mcgm.gov.in/ संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे.

७१४ (एल), ७.१५ (एल), ७१६ (एस), ७१७ (टी)

**सही/-**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २ रा माळा, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व), मुंबई- ४०००२७.
**दूरध्वनी क्र.** २३७४२१६२
E.mail - sg.gardens@mcgm.gov.in

**पीआरओ/९८७/जाहि./२०२४-२५**

**येता कणकण तापाची, तपासणी करून घ्या रक्ताची.**



**निडो होम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

**ई-लिलाव – वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.
सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर''** व **''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार, हमीदाराद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव | वसुली रक्कम | राखीव मूल्य व इरठे | लिलाव दिनांक व वेळ | परीक्षणाचा दिनांक व वेळ | प्रतीकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अब्बास अहमद खान (कर्जदार)** | **एलएएन नं. एलकेओएच०एचएल००००००७०५६५** अंतर्गत दि. १९.०८.२०२४ रोजीनुसार **रु. ५५,१०,९१६.४६/-** (रु. पंचावन्न लाख दहा हजार नऊशे सोळा व सेहेचाळीस पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज+कायदेशीर खर्च | **रु. ४३,२१,५१२/-** (रु. त्रेचाळीस लाख एकवीस हजार पाचशे बारा मात्र)<br>**इसारा रक्कम ठेव : रु. ४,३२,१५१/-** (रु. चार लाख बत्तीस हजार एकशे एकावन्न मात्र) | **१०.०९.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयंविस्तारासह)** | **२८.०८.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००** | **०९.०१.२०२४** |

**प्रतिभूत संपत्तीचा तपशील** – पुढील विवरणीत फ्लॅटचा सर्व तो भाग व भूखंड – फ्लॅट क्र. २०३, डी विंग, मोजमापित साधारण ४१.५३९ चौ. मी. चटई क्षेत्रफळ + ६.९४८ चौ. मी. सी. बी.+३.१७७ चौ. मी. एफ. बी.+७.२४३ चौ. मी. टेरेस क्षेत्र, दुसरा मजला, इमारतीचे नाव ''पांचनंद हाइट्स'', प्लॉट क्र. १५, १६, १७ व १८ धारक भूखंडावर निर्मित, सेक्टर ०९, फेज-१, तळोजा पांचनंद, तालुका पनवेल, जि. रायगड-४१० २०८ येथील.

**टीप :** १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई-लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल : **लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड**
**बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.**
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : ०९.०९.२०२४.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

**मोबाइल क्र. : (श्री. श्रीकांत पाठारे ९७६८७४६६२४)/(श्रीमती सुरेखा भणगे ९००४३५९८३५).**
**दिनांक : २०.०८.२०२४**

**सही/- प्राधिकृत अधिकारी**
**निडो होम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**



**जाहीर नोटीस**

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई
मुंबई नोंदणी क.बी.ओ.एम./डी.डी.आर (२) जीएनएल /(ओ)/१०२/२००१-२००२
यांचे कार्यालय पत्ता : ६/६०३, दुर्गा कृपा को-ऑप हौसिंग सोसायटी, हनुमान चौक, नवघर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१.

**ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.** **शाखा : साकीनाका**
पत्ता:- शॉप नं. ३६, सागर प्लाझिओ प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी, सुदर्शन हॉटेलसमोर, साकीनाका सिग्नलजवळ, अंधेरी-कुर्ला रोड, साकीनाका, मुंबई- ४०००७२. .... अर्जदार

अनुक्रमांक १ ते ३०

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | जाब देणार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उदय हरिनाथ राजभर | ११/०७/२०२४ | ३६८३/२०२४ | ३५३२७८ | १ |
| २ | शौकत गुलजार अहमद कामदार | ११/०७/२०२४ | ३६८३/२०२४ | ३५३२७८ | २ |
| ३ | विजय रामचंद्र काटकर | ११/०७/२०२४ | ३६८३/२०२४ | ३५३२७८ | ३ |
| ४ | अंकुश भाना पटेल | ११/०७/२०२४ | ३६८४/२०२४ | ७२२१६२ | २ |
| ५ | पवनकुमार गुलाबचंद गुप्ता | ११/०७/२०२४ | ३६८४/२०२४ | ७२२१६२ | ३ |
| ६ | उदय हरिनाथ राजभर | ११/०७/२०२४ | ३६८५/२०२४ | २८८४४१ | ३ |
| ७ | पवनकुमार गुलाबचंद शुक्ला | ११/०७/२०२४ | ३६८५/२०२४ | २८८४४१ | ४ |
| ८ | महेश प्रकाश शेवाळे | ११/०७/२०२४ | ३६८६/२०२४ | ११६३६२ | ३ |
| ९ | भिवसन रतन गोविंद | ११/०७/२०२४ | ३६८६/२०२४ | ११६३६२ | ५ |
| १० | मनिष भागुराम तांबे | ११/०७/२०२